लोकमत

## अखिल गोवा आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट : गणपत पार्सेकर महाविद्यालय उपविजेते

# विद्याप्रबोधिनी कॉलेजची बाजी




गणपत पार्सेकर महाविद्यालय आयोजित क्रिकेट स्पर्धेतील विजेत्या विद्या प्रबोधिनी संघाबरोबर माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर, प्राचार्य उदेश नाटेकर व अनिकेत केरकर.

लोकमत न्यूज नेटवर्क

**हरमल** : येथील हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या गणपत पार्सेकर कॉलेज ऑफ एज्युकेशनने आयोजित केलेल्या अखिल गोवा आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत विद्या प्रबोधिनी महाविद्यालयाच्या पुरुष व महिला संघांनी बाजी मारली. या स्पर्धेत एकूण १६ संघांनी भाग घेतला होता. स्पर्धा पार्सेकर महाविद्यालयाच्या मैदानावर झाली. पुरुष गटात पेडणे सरकारी महाविद्यालय उपविजेता ठरला.

पेडणे महाविद्यालयाचा आनंद मुट्टी हा मालिकावीर तसेच उत्कृष्ट फलंदाज, जयेश गडेकर हा उत्कृष्ट गोलंदाज व नेहाल परब हा सामनावीर ठरला. महिलांच्या गटात, गणपत पार्सेकर कॉलेज ऑफ एजुकेशन संघास उपविजेतेपद प्राप्त झाले. स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज क्लेन्सी फेर्नांडिस, उत्कृष्ट गोलंदाज खुशवी नाईक व तन्वी नाईक हिस सामनावीर व मालिकावीरचे बक्षीस प्राप्त झाले.

बक्षीस वितरणास हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळाचे चेअरमन तथा माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर, गणपत पार्सेकर महाविद्यालयाचे प्राचार्य उदेश नाटेकर, उपस्थित होते. या वेळी प्राचार्य नाटेकर यांनी पार्सेकर महाविद्यालयाच्या उपक्रमास सहकार्य केल्याबद्दल कौतुक व अभिनंदन केले. मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. पार्सेकर महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण अधिकारी अनिकेत केरकर यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.